DAY —— 07 SEAT NUMBER

| 2024 | VII | 24 | 1100 | J-169 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# HISTORY (38)

Time : 3 Hrs. (8 Pages) Max. Marks : 80

**सूचना :** *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
*(२) उजव्या बाजूस गुण दर्शविलेले आहेत.*
*(३) उत्तरपत्रिकेमध्ये आकृत्या पेनानेच काढाव्यात.*
*(४) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानांवर लिहावे.*

**प्र. १.** **(अ)** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा : (६) **[१०]**

(१) इ.स. १४४० मध्ये ------- याने छापखाना सुरू केला.
(अ) जेम्स वॅट (ब) गुटेनबर्ग
(क) ॲरिस्टॉटल (ड) होमर

(२) वास्को-द-गामा हा ------- या देशाचा दर्यावर्दी होता.
(अ) पोलंड (ब) इंग्लंड
(क) फ्रान्स (ड) पोर्तुगाल

(३) बिहारमधील ब्रिटीश मळेमालक शेतकऱ्यांवर ------- लागवडीची सक्ती करत होते.
(अ) निळीच्या (ब) चहाच्या
(क) कॉफीच्या (ड) उसाच्या

(४) ऑस्ट्रियाने १९१४ मध्ये सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले तेव्हा ------ हा देश सर्बियाच्या मदतीला धावून गेला.
(अ) जर्मनी (ब) अमेरिका
(क) हंगेरी (ड) रशिया

(५) सन १९८६ च्या ------- येथील परिषदेत दक्षिण आफ्रिकेला लागून असलेल्या राष्ट्रांच्या मदतीसाठी 'आफ्रिका फंड' स्थापन करण्यात आला.

(अ) जकार्ता (ब) हरारे

(क) नामिबिया (ड) इंडोनेशिया

(६) इ.स. १९९५ मध्ये भारत सरकारचा आरोग्य विभागातर्फे ------ मोहीम सुरू झाली.

(अ) गोवर- रूबेला (ब) पल्स पोलिओ

(क) बीसीजी (ड) त्रिगुणी लस

**(ब)** पुढील प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा : (४)

(१)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (i) कास्मो-द-ग्वार्द | — | पोर्तुगीज इतिहासकार |
| (ii) गोंसालू मार्तीस | — | पोर्तुगीज वकील |
| (iii) फ्राँस्वाँ मार्टिन | — | डच वखारीचा प्रमुख |
| (iv) हेन्री रेव्हिंग्टन | — | इंग्रज अधिकारी |

(२)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (i) श्यामजी कृष्ण वर्मा | — | इंडिया हाउस |
| (ii) अरविंद घोष | — | अनुशीलन समिती |
| (iii) लाला हरदयाळ | — | गदर |
| (iv) स्वातंत्र्यवीर सावरकर | — | हिंदुस्तान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मी |

(३)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (i) बांडुंग | — | बांडुंग परिषद |
| (ii) पॅरिस | — | १९१९ मधील पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| (iii) लंडन | — | १९०० मधील अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| (iv) मँचेस्टर | — | आशियाई ऐक्य परिषद |

(४) 'अ' गट — 'ब' गट

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (i) अण्णा हजारे | — | राष्ट्रीय युवा सशक्तीकरण कार्यक्रम |
| (ii) आर्थर डंकेल | — | जागतिक व्यापार संघटनेचे महासंचालक |
| (iii) असीमा चॅटर्जी | — | भारतीय विज्ञान काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्षा |
| (iv) फाजल अली | — | राज्य पुनर्रचना आयोग |

**प्र. २.** **(अ)** ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना या संबंधीची नावे लिहा : (४) **[८]**

(१) ब्रिटीशांनी थिबा राजाला महाराष्ट्रात ठेवलेले ठिकाण –

(२) चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे ठिकाण –

(३) भारतीय लष्कराने गोवा मुक्तीसाठी केलेल्या लष्करी कारवाईचे सांकेतिक नाव –

(४) दुसऱ्या महायुद्धातील इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका राष्ट्रांचा गट –

**(ब)** दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) अकराव्या शतकात युरोपामधील ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी जेरुसलेम व बेथेलहॅम ही शहरे परत मिळविण्यासाठी वेळोवेळी लढाया केल्या, कारण –

(अ) त्यांना प्रादेशिक विस्तार करावयाचा होता.

(ब) ही शहरे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम धर्माच्या अनुयायांसाठी अत्यंत पवित्र मानली जात होती.

(क) त्यांना सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा मिळवायचा होता.

(ड) ही अत्यंत प्रगत शहरे होती.

(२) इ.स. १७४४ ते १७६३ या काळात इंग्रज व फेंच यांच्यात तीन कर्नाटक युद्धे झाली, कारण –

(अ) दोन्ही सत्तांना कर्नाटकावर नियंत्रण हवे होते.

(ब) इंग्रज-फ्रेंच सतत संघर्ष करत होते.

(क) इंग्रज-फ्रेंच दोन्ही सत्तांनी कर्नाटकच्या नबाब घराण्यातील सत्ता स्पर्धेत हस्तक्षेप केला.

(ड) दोन्ही सत्तांना कर्नाटक येथे वखारी स्थापन करावयाच्या होत्या.

(३) ॲन्झुस (ANZUS) करारात ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड आणि युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही, कारण –

(अ) त्यांना ग्रेट ब्रिटन व फ्रान्सचे महत्त्व वाढू द्यायचे नव्हते.

(ब) हा लष्कारी करार होता.

(क) हा गुप्त करार होता.

(ड) हा मित्र देशातील करार होता.

(४) राहीबाई पोपेरे यांना भारताच्या राष्ट्रपतींनी 'नारी शक्ती' पुरस्कार दिला, कारण –


(अ) त्यांनी 'कळसुबाई परिसर बियाणे संवर्धन समितीच्या' माध्यमातून देशी वाणाच्या बियांचे संवर्धन केले.

(ब) त्यांनी बचत गट सुरू केला.

(क) त्यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य मोठे आहे.

(ड) त्या सामाजिक क्षेत्रात कार्यरत होत्या.


**प्र. ३. (अ)** (५) **[१३]**



(१) हैदराबाद येथे कोणाची सत्ता होती?
(२) आग्रा व दिल्ली येथे कोणाची सत्ता होती?
(३) जंजीरा येथे कोणाची सत्ता होती?
(४) पुदुच्चेरी (पाँडेचरी) येथे कोणाची सत्ता होती?
(५) भारताच्या दक्षिणेला कोणता महासागर आहे?

**(ब)** दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा (कोणतीही चार) : (८)


(१) संकल्पना चित्र पूर्ण करा.





(२) संकल्पना तक्ता पूर्ण करा.

| | |
|---|---|
| आर्य समाज | --------------- |
| --------------- | राजा राममोहन रॉय |
| रामकृष्ण मिशन | --------------- |
| --------------- | महात्मा फुले |


(३) संकल्पना चित्र पूर्ण करा.



(४) संकल्पना चित्र पूर्ण करा




(५) कालरेषा पूर्ण करा.




(६) खालील तक्ता पूर्ण करा.

| | |
|---|---|
| हमीद दलवाई | --------------- |
| --------------- | सुंदरलाल बहुगुणा |
| मेधा पाटकर | --------------- |
| --------------- | डॉ राजेंद्र सिंह |

**प्र. ४.** **(अ)** संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही <u>तीन</u>) : (६) **[१५]**

(१) ब्रिटीश वखार

(२) प्रतिसरकार

(३) अलिप्ततावाद

(४) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

(५) खेलो इंडिया

**(ब)** पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही <u>तीन</u>) : (९)

(१) युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या.

(२) भारतात समाजसुधारकांनी जनजागृती करण्यास सुरुवात केली.

(३) हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

(४) इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला.

(५) सेंटो करार विसर्जित करण्यात आला.

**प्र. ५. खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा ( कोणतेही <u>तीन</u> ) : [९]**

(१) औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात आर्थिक राष्ट्रवाद व साम्राज्यवाद उदयास आला.

(२) मराठी सत्तेचे धोरण वसाहतवाद विरोधी होते.

(३) रविंद्रनाथ टागोर यांनी 'सर' या पदवीचा त्याग केला.

(४) दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास अधिकच वेग आला.

(५) भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.

**प्र. ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा ( कोणतेही <u>दोन</u> ) : [१०]**

(१) युरोपातील धर्मयुद्धाच्या अपयशाची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

(२) भारतातील पोर्तुगीज वसाहतींविषयी विस्तृत माहिती लिहा.

(३) 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' याविषयी सविस्तर माहिती लिहा.

**प्र. ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही <u>तीन</u>) : [१५]**

(१) ब्रह्मी युद्धांची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे लिहा :

(अ) पहिले ब्रह्मी युद्ध

(ब) दुसरे ब्रह्मी युद्ध

(क) तिसरे ब्रह्मी युद्ध

(२) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याविषयी माहिती लिहा :

(अ) कारणे

(ब) परिणाम

(३) फ्रेंच वसाहतीच्या विलीनीकरणाविषयी सविस्तर माहिती लिहा :

(अ) पुदुच्चेरी (पाँडेचेरी)

(ब) चंद्रनगर

(४) शीतयुद्धाविषयी सविस्तर माहिती लिहा :

(अ) शीतयुद्धाची व्याख्या

(ब) शीतयुद्धाची पार्श्वभूमी

(क) शीतयुद्धाची वाटचाल

(५) पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील प्रयोगांची सविस्तर माहिती लिहा :

(अ) भाऊ काटदरे आणि सह्याद्री निसर्ग मित्र

(ब) प्रेमसागर मेस्त्री आणि सी-स्कॅप संस्था

◆◆◆